# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

**// बांधकाम/ विद्युत विभाग //**

**जा.क्र.मनपा/साबां/2482 /2024-25**
**दि. 02/ 08 /2024**

**प्रति,**
**मा. उपायुक्त**
घनकचरा व्यवस्थापन
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :-** भाईंदर (पूर्व) नवघर गांव येथील जुना तलाव बाबत.

**महोदय**

भाईंदर (पू.) नवघर येथील जुना तलावाचे संवर्धन व सुशोभिकरण करणे कामासाठी नगरविकास विभाग शासन निर्णय क:- अमृत-2022 /प्र. क्र.268/ नवि - 33 दि.02-11-2022 अन्वये मान्यता देण्यात आली असून सदर कामासाठी ठेकेदार मे. एन.के.शाह इन्फ्रा प्रोजेक्ट यांना जा.क्र. मनपा/साबां/कार्या/352/2023 दि.05-09-2023 अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे.

सदर कामा अंतर्गत पाण्याचा उपसा केला असता तलावाच्या प्रवेश प्रवेशद्वारकडील भिंत धसल्यामुळे सदर तलावाच्या भिंतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले असून सदर बाबत स्ट्रक्चरल इंजिनिअर यांच्या कडून सदर तलावाच्या भिंती सुरक्षित नसल्याचा अहवाल प्राप्त झालेला आहे. तसेच सदर तलावाच्या भिंतीचे बांधकाम करणेसाठी खोदकाम केले असता तलावाच्या भिंतीचा कांही भाग ढासळण्यास सुरुवात झाल्यामुळे सदर ठिंकाणी तात्पूरत्या स्वरुपात दुरुस्ती करुन काम बंद करणेत आलेले आहे.

सद्यास्थितीत पावसाळा कालावधी असल्यामुळे तलावाची भिंत ढासळून अपघात होण्याची शक्यता असल्यामुळे सदर नवघर गांव येथिल जूना तलाव दि.20-06-2024 पासून सर्वासाठी बंद ठेवणेत आलेला आहे. त्यामुळे श्रीगणेश मुर्ती विर्सजनासह इतर धार्मिक विधी साठी सदर नवघर जूना तलावाचे काम पूर्ण होई पर्यंत उपलब्ध होणार नाही. सदर बाबतीत आवश्यक प्रसिध्दी देणेसाठी पूढील कार्यवाही करावी हि विनंती.

**प्रत:-** कार्यवाहीसाठी
जनसंपर्क अधिकारी
मिरा-भाईंदरमहानगरपालिका

**(नितिन मुकणे)**
**कार्यकारी अभियंता (साबां)**
मिरा-भाईंदरमहानगरपालिका

PC-13/24-25/RP/L-12